-: जाहिर निविदा :-

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, या न्यायालयाचे आवारात जिल्हा व सत्र न्यायालय,नेवासा व दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, नेवासा या दोन्ही न्यायालयातील फक्त न्यायालयीन कागदपत्राच्या छायांकित प्रती काढणेसाठी विहित कार्य पध्दतीचा अवलंब करून व मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किंवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नेमणुक करावयाची असुन त्यासाठी स्वत:ची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक असुन झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी, वरील कामासाठी इच्छुक व्यक्तींनी किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन नं. ७४३/२०१३ अन्वये अपंग व्यक्तींना झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक २७/०६/२०२६ अखेर सायंकाळी ०६.०० पर्यंत या न्यायालयात सादर करावेत. तसेच अपंग व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपंग प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

तसेच मा. महोदयांच्या तोंडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नियुक्त करण्यात येणा-या व्यक्ती / फर्मकरीता झेरॉक्स आउटसोर्सिंगच्या कामासाठी ए-४ कागदाकरीता रूपये १-२५ पैसे, लिगल कागदाकरीता रूपये १-५० पैसे व ए-३ कागदाकरीता रूपये २-०० अशी रक्कम आकारण्यासाठी मंजुरी देणेबाबत विचाराधीन आहे. दिनांक २७/०६/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० नंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर बाबतच्या मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती या माहीतीसाठी अधीक्षक कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, नेवासा, जि. अहमदनगर, येथे उपलब्ध आहेत.

आज दिनांक १८/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

18/6/26

(एच. आर. वाघमारे)
जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश नेवासा, जि.अहमदनगर

जा. क्र. १०६३ /२०२६))
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा))
दिनांक- १८/०६/२०२६))

टिप :- अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नेवासा यांनी सदर जाहीर नोटीस खालील नमुद ठिकाणी बेलिफामार्फत संबंधीतांस निर्देशित होईल अशी बजावणी करून त्याबाबत संबंधित बेलिफाने त्याबाबतचा अहवाल निम्नस्वाक्षरीकारांना सादर करावा.

प्रत :- १. नेवासा येथील सर्व न्यायालयांचे नोटीस बोर्ड.
२. तहसिल कार्यालय, नेवासा.
३. नगरपंचायत कार्यालय, नेवासा
४. वकील संघाचे नोटीस बोर्ड, नेवासा
५. पंचायत समिती, नेवासा
६. कृषी कार्यालय, नेवासा
७. उपकोषागार कार्यालय, नेवासा
८. भूमी अभिलेख कार्यालय, नेवासा
९. उपजिल्हा रुग्णालय, नेवासा
१०. ज्ञानोदय उच्च माध्यमिक विद्यालय, नेवासा
११ एस. टि स्टँड कार्यालय, नेवासा
१२. प्राथमिक आरोग्य केंद्र, नेवासा
१३. तलाठी कार्यालय, नेवासा
१४. नेवासा पोलिस स्टेशन, नेवासा
१५. स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा नेवासा
१६ न्यायालयीन ई - कोर्ट प्रणाली
१७. नेवासा परिसरातील झेरॉक्स दुकाने असलेले ठिकाण
१८ स्थळ प्रत